जनसंपर्क कक्ष

4 AUG 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संपूर्ण देश जगवण्याचे कार्य शेतकरी करतो

## शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शेतीमध्ये विविध वाणांचा शोध लावून, ते पिकवण्यासाठी शेतकरी प्रयत्न करीत असतो, म्हणूनच 'शेतकरी हा खरा संशोधक आहे. देशातील विविध भागांमध्ये उपलब्ध परिस्थिती शेतीच्या माध्यमातून देश जगवण्याचे महत्वाचे कार्य शेतकरी करतो. पिकांमुळे कार्बनडाय ऑक्साईड शोषून ऑक्सिजन बाहेर सोडला जातो. त्यामुळे कार्बन क्रेडिट शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभाग व शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'कार्बन क्रेडीटस आणि जलव्यवस्थापन" या विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना रघुनाथदादा पाटील. सोबत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. आर. मोरे.

पाटील म्हणाले, लाखो शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य मूल्य मिळाले तर शेतकरी आत्महत्येपासून परावृत्त होईल, असे सांगत अप्रत्यक्षपणे त्यांनी सरकारवर टिका केली.पाणी, हवा, ध्वनी प्रदूषण वाढत असताना, शेतकरी शेतीला पाणी देवून तापमान कमी करण्याचे महत्वाचे कार्य करीत आहे. जलव्यवस्थापन करणे सध्याच्या काळाची गरज आहे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, औद्योगिकरणामुळे नैसर्गिक साधन संपत्तीची हानी झाली आहे. प्रदूषण कमी करणे सर्वांची जबाबदारी आहे. दिवसभरात पांडुरंग तोडकर यांनी 'जलसंजीवनी", डॉ. पी. डी. राऊत यांनी 'कार्बन साठवण आणि शेती", डॉ. बालेखान. मुजावर यांनी 'जलव्यवस्थापन", डॉ. गिरीश राऊत यांनी 'कार्बन क्रेडीट्स" विषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरण विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. ज्योती जाधव उपस्थित होते.

4 AUG 2018 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाच्या अहवालातून उच्च शिक्षणाची स्थिती उघड

# विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरात वाढ

**प्रतिनिधी, पुणे**

देशभरातील शिक्षण संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी विद्यार्थिसंख्या वाढल्याचा परिणाम विद्यार्थी शिक्षक गुणोत्तरावर झाला आहे. सध्या देशात विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील नियमित अभ्यासक्रमांसाठी ३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे प्रमाण आहे. प्रत्येक राज्यातील विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर वेगळे असून, महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील नियमित अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर २६ आणि नियमित-दूरशिक्षण एकत्रित अभ्यासक्रमांसाठीचे गुणोत्तर ३२ आहे.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणीच्या अहवालातून ही माहिती समोर आली. गेल्या पाच वर्षांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या जवळपास १३.३ टक्क्यांनी वाढली आहे. २०१३-१४ मध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३ कोटी २३ लाख ३६ हजार २३४ होती. ती २०१७-१८ मध्ये ३ कोटी ६६ लाख ४२ हजार ३७८ झाली. प्रत्येक राज्यातील नियमित अभ्यासक्रमांसाठीचे शिक्षक विद्यार्थी गुणोत्तर वेगळे आहे. त्यात बिहार, उत्तर प्रदेश आणि झारखंडमध्ये ५०हून अधिक, तर कर्नाटकमध्ये १८ असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील नियमित आणि दूरशिक्षण, नियमित अभ्यासक्रमासाठीचे विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर अनुक्रमे ३२ आणि २६ आहे. २०१६-१७ आणि २०१५-१६ मध्ये हेच गुणोत्तर अनुक्रमे ३० आणि २४, २६ आणि २२ असे होते. या आकडेवारीवरून दरवर्षी विद्यार्थी शिक्षक गुणोत्तरामध्ये वाढ होत असल्याचे स्पष्ट होते.

### विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर

| वर्ष | विद्यापीठ आणि महाविद्यालय | विद्यापीठे आणि घटक संस्था |
|---|---|---|
| २०१७-१८ | ३० | २० |
| २०१६-१७ | २५ | १९ |
| २०१५-१६ | २१ | १६ |
| २०१४-१५ | २२ | १५ |

"प्राध्यापक भरती थांबवण्यात आलेली असल्याने महाविद्यालयांमध्ये नियमित शिक्षकांपेक्षा अ‍ॅड हॉक किंवा करार तत्त्वावरील शिक्षकांचे प्रमाण अधिक आहे. अहवालासाठी मान्यताप्राप्त आणि नियमित शिक्षकांचीच माहिती देण्यात येते. अ‍ॅड हॉक किंवा करार तत्त्वावरील शिक्षकांची माहिती देणे अपेक्षित नाही. दोन्ही प्रकारच्या शिक्षकांची संख्या विचारात घेतल्यास हे गुणोत्तर बदलेल.

**- डॉ. राजेंद्र झुंजारराव**, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

### सर्वाधिक महाविद्यालये असलेले महाराष्ट्रातील तीन जिल्हे

सर्वाधिक महाविद्यालये असलेल्या देशभरातील दहा जिल्ह्यांच्या यादीत महाराष्ट्रातील तीन जिल्हे आहेत. त्यात पुणे जिल्हा चौथ्या स्थानावर आहे. पुणे जिल्ह्यात ४४२ महाविद्यालये आहेत. या यादीत नागपूर सहाव्या आणि मुंबई आठव्या स्थानी आहे. नागपूरमध्ये ३३७ आणि मुंबईत ३१३ महाविद्यालये आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत मुंबईची एका स्थानाने घसरण झाली आहे. मागील वर्षी सातव्या स्थानी असलेला मुंबई जिल्हा या अहवालात आठव्या स्थानी आहे. मुंबईचे सातवे स्थान अलाहाबाद जिल्ह्याने घेतले आहे. या यादीत बंगळुरु (शहरी) पहिल्या स्थानी, जयपूर दुसऱ्या आणि हैदराबाद तिसऱ्या स्थानी आहे.

# विद्यापीठाचे ८० टक्के निकाल मुदतीत

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

**परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांची माहिती**

'शिवाजी विद्यापीठाच्या मार्च ते जुलै या कालावधीत घेण्यात आलेल्या परीक्षांपैकी ८० परीक्षांचे निकाल ४५ दिवसांच्या मुदतीत जाहीर करण्यात आले आहेत,' अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली. दरम्यान, अद्याप १२८ परीक्षांचे निकाल तांत्रिक कारणांमुळे जाहीर झाले नसून लवकरच हे निकाल जाहीर होतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

मार्च ते जुलै या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील एकूण ६३४ परीक्षा घेण्यात आल्या. यापैकी ६१८ परीक्षांपैकी ४९० परीक्षांचे निकाल परीक्षेनंतर ४५ दिवसात जाहीर करण्यात आले आहेत. ज्या परीक्षांचे निकाल मुदतीत जाहीर झाले नाहीत त्यासाठी तज्ज्ञ प्राध्यापकांची उपलब्धता नसणे, कंत्राटी प्राध्यापकांच्या नियुक्तीची मुदत संपणे व बहुतांश कॉलेजमध्ये सुरू असलेली नॅक प्रक्रिया ही कारणे आहेत.

परीक्षा विभागातर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या चार वर्षांत विद्यापीठाचे निकाल सरासरी ३५ दिवसात जाहीर झाले आहेत. याबाबतचा तपशील बृहत आराखड्यातही जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, 'गेल्यावर्षीच्या जुलैपासून एमकेसीएल संगणकीय प्रणाली बंद करण्यात आली. या प्रणालीद्वारे साठ हजार उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी उर्वरित ३० हजार विद्यार्थी विद्यापीठाच्या प्रणालीमध्ये प्रवेशित करण्यात आले. यानुसार सव्वातीन लाख विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाच्या प्रणालीत स्थानांतरीत करण्यात आली. या पैकी १८९ विद्यार्थ्यांचा तपशील अद्याप प्राप्त झाला नसून ज्या बाबींची पूर्तता अपूर्ण आहे, त्याबाबत परीक्षा विभागाचे प्रयत्न सुरू आहेत, असेही काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

# शेतीच्या बळावर कार्बन क्रेडिटस् मिळविणे शक्य

## कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारत हा शेतीप्रधान देश असून शेतीच्या बळावर देशाला मोठ्या प्रमाणावर कार्बन क्रेडिटस् मिळविणे शक्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कार्बन क्रेडिटस् आणि जल व्यवस्थापन' या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्‌घटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहामध्ये आयोजित कार्यशाळेस शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील, विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मानवाने औद्योगिकीकरणाला सुरुवात केल्यापासून निसर्गाच्या साधनसंपत्तीच्या



**शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

रक्षणाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण जास्त झाले आहे. औद्योगिकरणास सुरुवात करणाऱ्या विकसित राष्ट्रांनी याची जबाबदारी घेतली नाही. त्यामुळे ही जबाबदारी विकसनशील देशांकडे आली. यामधून जागतिक प्रदूषण कमी करण्याचा विचार पुढे आला. या प्रदूषण कमी करण्याच्या प्रक्रियेस 'कार्बन क्रेडिट' म्हणतात.

रघुनाथदादा पाटील म्हणाले, शेतकरी हा खरा संशोधक आहे. शेतीच्या माध्यमातून अन्नधान्यांच्या विविध वाणांचा प्रयोगाअंती शोध लावून पिकविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतो. शेतकऱ्यांनी लावलेल्या कोट्यवधी झाडांचे पर्यावरणीय मूल्य मिळणार असेल, तर शेतकरी आत्महत्या थांबण्यास ते उपयुक्तच ठरेल.

डॉ.विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ.बालेखान मुजावर, डॉ. गिरीश राऊत, डॉ.प्रणाली राऊत, डॉ. ए. डी. जाधव यांच्यासह सोलापूर, पंढरपूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, नाशिक, बीड आदी राज्याच्या विविध भागांतून आलेले शेतकरी बांधव उपस्थित होते.

सकाळ



**कोल्हापूर : शारदाबाई पवार अध्यासनाच्या व्याख्यानात बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. मंजूश्री पवार, प्रा. नंदा पारेकर आदी.**

# राजर्षी शाहूंचे कायदे मार्गदर्शक

## डॉ. शिर्के; 'शारदाबाई पवार'तर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. ३ :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी लागू केलेला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा आजही मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे आयोजित 'राजर्षी शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा' विषयावर कार्यशाळेत ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळा झाली.

डॉ. शिर्के म्हणाले, ''आजही स्त्रियांवर हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. या संबंधांतील आकडेवारी समाजाला चिंता करण्यास लावणारी आहे. ही स्थिती बदलायची असेल तर कुटुंबांपासून सुरुवात करून स्त्रियांचा सन्मान केला तरच हिंसाचार संपुष्टात येतील.'' प्रा. डॉ. मंजूश्री पवार व तनुजा शिपूरकर यांनी 'छत्रपती शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधाचा कायदा आणि समाजाचे वास्तव', तर डॉ. मेघा पानसरे व ॲड. आसावरी कुलकर्णी यांनी 'सध्या अस्तित्वात असलेला कायदा आणि आजचे वास्तव' विषयावर माहिती दिली. या प्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. नंदा पारेकर, डॉ. मानसिंग टकले, डॉ. ए. बी. मोहळकर, डॉ. एम. व्ही. वाळवेकर उपस्थित होते. डॉ. भारती पाटील, डॉ. प्रतिभा देसाई, सचिन पाटील, किरण शिंदे, शिल्पा चव्हाण, सरला हजारे, महादेवी भिसे यांनी संयोजन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur-Today
04/08/2018 Page No. 5